## 8. मूलभूत हक्क
## भाग III कलम 12 ते 35

- **स्वीकार -** अमेरिका
- मुलभूत हक्काची सुरुवात इंग्लंडमधील मॅग्नाकार्टा पासून झालेली असून हे मुलभूत हक्क आपण अमेरिकेच्या घटनेतून स्वीकारलेली असून सुरुवातीला 7 मुलभूत हक्क होते नंतर 1978 च्या 44 व्या घटनादुरुस्तीनुसार संपत्ती किंवा मालमत्तेचा हक्क रद्द करण्यात आलेला असून सध्या घटनेत 6 मुलभूत हक्क आहेत.

**मुलभूत हक्काची वैशिष्ट्ये :-**

- घटनेचा अविभाज्य भाग असून कायद्याद्वारे बदलता येते.
- केवळ भारतीय नागरिकांनाच उपलब्ध. (कलम 15, 16, 19, 29, 30)
- मुलभूत हक्क हे गुणात्मक आहेत.
- मुलभूत हक्क हे सकारात्मक व नकारात्मक आहेत.
- मुलभूत हक्कामध्ये घटनादुरुस्ती करता येते.
- राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात कलम 20 आणि 21 वगळता इतर हक्क स्थगित होतात.
- मुलभूत हक्क न्यायप्रविष्ठ आहेत.
- राजकीय लोकशाही प्रस्थापित करतात.

**मुलभूत हक्कातील कलमे व तरतुदी :-**

- **कलम 12 -** राज्यसंस्थेची व्याख्या.
- **कलम 13 -** मुलभूत हक्कांशी विसंगत असलेले कायदे.

### 1) समतेचा अधिकार (कलम 14 ते 18) :-

- कलम 14 ते 18 दरम्यान हा अधिकार सांगितलो आहे.
- कायद्यापुढे समानता आणि कायद्याचे समान संरक्षण प्राप्त होते.

**1. कायद्यापुढे समानता (कलम 14 नुसार) :-**

- भारतात कायद्यासमोर प्रत्येक व्यक्ती एक आणि एकच.
- धर्म, वंश, जात, स्त्री-पुरुष, श्रीमंत-गरीब, वरीष्ठ-कनिष्ठ असा कोणताच भेदभाव नको.
- या कलमातून "कायद्याचे अधिराज्य" हे तत्त्व दिसून येते.

- राष्ट्रपती व राज्यपाल यांनी पार पाडलेले अधिकार व कर्तव्ये याबाबत न्यायालयात स्पष्टीकरणासाठी दबाव नाही.

**2. भेदभावास प्रतिबंध (कलम 15) :-**

- धर्म, लिंग, वंश, जात, जन्मस्थळ, स्त्री-पुरुष या आधारावर भेदभाव करता येणार नाही.
- वरील आधारावर कोणत्याही एका कारणामुळे खालील बाबतीत अपात्र, बेदखल, निर्बंधीत करता येणारनाही.
  उदा. दुकाने, सार्वजनिक उपहारगृहे, हॉटेल्स, करमणूक गृहे.
- सर्वसाधारण जनतेसाठी असलेल्या सार्वजनिक ठिकाणी.
  उदा. विहीरी, तलाव, स्नानगृहे, स्मशानघाट, रस्ते, सार्वजनिक विश्रांतीची ठिकाणी इत्यादी वापर करण्यास प्रतिबंध करता येणार नाही.

**3. समान संधी (कलम 16) :-**

- प्रत्येक नागरिकाला आपल्या राज्यामध्ये पात्रतेनुसार नोकरी करण्याचा, पद ग्रहण करण्याचा अधिकार आहे.
- यासाठी कोणालाही धर्म, वंश, जात, स्त्री-पुरुष, जन्मस्थान, निवासस्थान या आधारावर वंचित करता येत नाही.

**पुढील परिस्थितीत संसद कायदा करु शकते.**

- राज्यसरकार, केंद्रशासित प्रदेश, स्थानिक शासन, आखत्यारीत एखाद्या नियुक्तीसाठी "वास्तव्याची अट आवश्यक" वाटल्यास संसद कायदा करु शकते.
- राज्यातील सेवेत मागासवर्गीयांना पुरेसे प्रतिनिधीत्व मिळाले नसल्यास त्यांच्या पदांत/नियुक्त्यांत आरक्षणाची तरतुद राज्याला करता येते.

**4. अस्पृश्ता निवारण (कलम 17) :-**

- स्पृश्य-अस्पृयता पाळणे हा गुन्हा - कायद्यानुसार शिक्षा.
- संसदेने 1955 साली यासंबंधी कायदा केला. अस्पृश्यता पाळणे हा फौजदारी गुन्हा ठरविला.
- स्वरुप - 6 महिने कारावास किंवा 500 रु. दंड

**5. पदव्यांची समाप्ती (कलम 18) :-**

- पुर्वी सरकारतर्फे रावसाहेब, रावबहाद्दूर, दिवाणसाहेब, खानबहाद्दूर अशा पदव्या दिल्या जात होत्या.
- ह्या पदव्या सामाजिक-राजकीय कामगिरीसाठी.
- अशा व्यक्तींना विशेष अधिकार प्राप्त होत असे. त्यामुळे समाजात भेदभावाची दरी वाहू लागली.
- म्हणून या पदव्या कायद्याने बंद केल्या.

**भारत सरकार व राज्य सरकारला काही अधिकार :-**

- पद्मश्री, पद्मभुषण, पद्मविभूषण, उद्यानपंडित, कृषीपंडीत, भारतरत्न ह्या पदव्या देता येतात.
- सैनिकी व शिक्षणविषयक पदव्या देण्यास बंदी नाही.
- भारतातील कोणतेही व्यक्ती वा शासकीय नोकरी करणारा परकीय व्यक्ती परराष्ट्राकडून भारत सरकारच्या परवानगीशिवाय कोणतेही पद स्विकारु शकत नाही. त्यासाठी राष्ट्रपतींची संमती आवश्यक.

**2) व्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार (कलम 19 ते 22नुसार) :-**

- समाजहिताला घातक कृत्य करुन कोणीही आपला स्वार्थ साधु शकत नाही, म्हणून व्यक्तीस्वातंत्र्यावर उचित बंधने.
  घटनेच्या 19 व्या कलमानुसार सात प्रकारचे स्वातंत्र्य :-

**1. 19 : (1) - भाषण, अभिव्यक्ती, मतप्रदर्शनाचे स्वातंत्र्य :-**

- 1. शांततेचे स्वातंत्र्य, 2. वृत्तपत्र स्वातंत्र्य, 3. व्यावसायिक जाहीरातींचे स्वातंत्र्य, 4. प्रसारण करण्याचा हक्क, 5. मुद्रण स्वातंत्र्याचा अधिकार, 6. निदर्शने करण्याचा हक्क पण संप करण्याचा हक्क नाही. 7. राजकीय पक्ष किंवा संघटनेने आवाहन केलेल्या बंद विरोधात हक्क. उदा. 1950 साली ब्रिजभुषण विरुद्ध दिल्ली राज्य.
  सर्वोच्च न्यायालय - "राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मुद्रणस्वातंत्र्यावर राज्याने नियंत्रण ठेवणे युक्तिसंगत आहे."

**1951 साली 19 व्या कलामत घटनादुरुस्ती :- बंधने**

- 1. राज्याचे संरक्षण, 2. परराज्याशी असलेले मित्रत्वाचे संबंध, 3. सार्वजनिक शांतता आणि सुव्यवस्था, 4. सभ्यता & नीतीमत्ता, 5. कोर्टाचा अवमान करणारे, 6. कोणाची बदनामी करणारे, 7. गुन्ह्यास उत्तेजन करणारे.

**2. शांततापूर्वक परंतु शस्त्राशिवाय सभा भरविण्याचे स्वातंत्र्य :-**

- ह्या अधिकाराशिवाय भाषण & व्यक्तीस्वातंत्र्याचा अधिकार दुबळा होतो.
- देशाचे सार्वभौमत्व व अखंडत्व टिकवून ठेवण्यासाठी.
- सभ्यता व नैतिकता. उदा. भारत सरकार विरुद्ध इंद्रदेवसिंग. निर्णय - सरकारची बंधने योग्य की अयोग्य - सर्वोच्च न्यायालय.

**3. संस्था आणि संघ स्थापन करण्याचा अधिकार :-**

- भारतात हा मुलभुत अधिकार गणला जातो.
- 1. मर्यादित मंडळे, 2. भागीदारी संस्था, 3. सांस्कृतिक मंडळ, 4. कामगार संघटना.
- सामाजिक, आर्थिक, राजकीय संघटना स्थापन करण्याचा अधिकार.
- भारताची एकात्मता, सार्वभौमत्व, ऐक्य यांना बाधा निर्माण असेल तर ती संस्था बेकायदेशीर.
  उदा. 1975 च्या आणिबाणी व 1992 च्या सत्तारुढ पक्षाने 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' व इतर संस्थेवर बंदी.

**4. भारतभर मुक्त संचाराचे स्वातंत्र्य :-**

- यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याची पुर्तता झाली.

**बंधने -**

- संसर्गजन्य रोग्याला संचार करण्यापासून सरकार परावृत्त करु शकते.
- कायद्याने स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीचे संचार स्वातंत्र्य नष्ट होते.
- सरकारने सुरक्षित म्हणून घोषित केलेल्या जागी सरकारच्या परवानगीशिवाय संचार करता येत नाही.
- ही बंधने योग्य - सर्वोच्च न्यायालयास अधिकार -
  उदा. 1950 साली कोलकत्ता उच्च न्यायालयाने प. बंगालच्या सुरक्षा कायद्याचे 38 वे कलम याच आधारावर अवैध केले.

**5. भारतात कोठेही राहणे वा कायम वास्तव्य करणे :-**

- हा अधिकार संचार स्वातंत्र्याला पुरक.
- सार्वजनिक हिताच्या दृष्टीने, अनुसुचित जाती/जमातीच्या हितासाठी सरकार बंधने घालू शकते.
- उदा. इब्राहिम वजीर विरुद्ध मुंबई राज्य (1954).
- सर्वोच्च न्यायालयाचा निकाल - पाक शरणार्थीच्या आगमनासंबंधीचे नियंत्रण कायद्याचे 7 वे कलम अवैद्य ठरविले.

**6. कोणताही धंदा, व्यवसाय किंवा व्यापार करण्याचे स्वातंत्र्य :-**

- कलम 19 नुसार हा अधिकार.
- असा अधिकार स्वीस नागरिकांना त्यांच्या संविधानाने दिला आहे.
- पुर्वी जातीच्या आधारावर व्यवसाय, पण आज स्वतःच्या मतानुसार.

**सरकारचे नियंत्रण -**

- व्यवसाय करण्यासाठी सरकार पात्रतेची अट.
- एखादा व्यवसाय स्वतःकडे घेण्याचा अधिकार.

उदा. "मोतीलाल विरुद्ध उत्तरप्रदेश" सरकारने उद्योगधंदे स्वतःकडे. म्हणून मोटार वाहतूक, वीज, खाणी इत्यादी राष्ट्रीयकरण झाले.

**व्यक्ती स्वातंत्र्याची हमी**

20, 21, 22 कलमानुसार 19 व्या कलमात सात स्वातंत्र्याचे संरक्षण नागरिकांना -

**1) दोष सिद्ध करण्याचे स्वातंत्र्य (कलम 20 नुसार) :-**

- "जोपर्यंत प्रचलित कायद्यानुसार गुन्हा झाला आहे हे सिद्ध होत नाही, तोपर्यंत अपराधाकरिता शिक्षा करता येत नाही."
- एकाच गुन्ह्यासाठी एकाचवेळी एकापेक्षा जास्त वेळा शिक्षा देता येणार नाही.
- कायद्याने सांगितलेल्या शिक्षेपेक्षा जास्त शिक्षा देता येत नाही.
- स्वतः विरुद्ध साक्ष देण्यास भाग पाडता येत नाही.

**2) जीवित स्वातंत्र्याचे संरक्षण (कलम 21 नुसार) :-**

"कोणत्याही व्यक्तीचे जीवन स्वातंत्र्य वा वैयक्तिक स्वातंत्र्य कायद्याने ठरवुन दिलेल्या पद्धतीशिवाय अन्य तऱ्हेने हिरावून घेतले जाणार नाही."

- ह्या कायद्याची निर्मिती - जपान व अमेरिकेच्या संविधानावरुन -
- **कलम 21 अ -** 6 ते 14 वयोगटासाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत. (2002 च्या 86 व्या घटनादुरुस्तीद्वारे घटनेत समावेश)

**3) नजरबंदीपासून संरक्षण (कलम 22 नुसार) :-**

- अटक झालेल्या व्यक्तीस कोणत्या कारणासाठी अटक झाली, हे जाणून घेण्याचा अधिकार.
- स्वतःच्या मर्जीनुसार कोणत्याही कायदेपंडीताचा सल्ला - बचाव.
- अटक केलेल्या व्यक्तीला 24 तासाच्या आत जवळच्या न्यायालयात.

**अपवाद :-**

- परकीय शत्रू म्हणून अटक झालेली व्यक्ती.
- प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्यानुसार अटक झालेल्या व्यक्ती.

**4) शोषणाविरुद्ध हक्क (कलम 23 नुसार) :-**

- गुलामगिरीच्या प्रथेबरोबरच वेशाव्यवसायालाही बंदी.
- 24 व्या कलमाने - 14 वर्षांचा आतील मुला-मुलींना खाणी किंवा धोक्याच्या ठिकाणी कामावर ठेवण्यास बंदी.

पण सार्वजनिक हिताच्या दृष्टीने सरकार काम करुन घेवू शकते. उदा. लष्करी भरती, पुर निवारण, राष्ट्र उभारणीचे कार्य.

**5) धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार (कलम 25-28) :-**

- कलम 25 :- धर्माचा उच्चार, आचार व प्रचार करण्याचा हक्क.
- कलम 26 :- धार्मिक संस्था, विश्वस्त मंडळ स्थापन, कारभार पाहणे.
- कलम 27 :- कोणत्याही धर्माच्या प्रचारासाठी सक्तीने पैसा गोळा करण्यावर बंदी.
- कलम 28 :- शिक्षण संस्थातून धर्मिक शिक्षणावर बंदी.

**6) सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार (कलम 29-30) :-**

- कलम 29 :- स्वतःची भाषा, लिपी, संस्कृती जोपासण्याचा.
- कलम 30 :- धार्मिक वा भाषिक अल्पसंख्यांकाना स्वतःच्या शिक्षणसंस्था स्थापण्याचा अधिकार.

**7) घटनात्मक उपायांचा अधिकार (कलम 32) :-**

**पाच प्रकारचे अर्ज :-**

**1. बंदी प्रत्यक्षीकरण (Habeas Corpus) :- सदेह उपस्थित राहणे**

- Habeas Corpus - लॅटीन शब्द. अर्थ - Let us have the body = आम्हाला शरीर द्या.
- 1979 साली हा कायदा इंग्लंडमध्ये पास झाला.
- अमेरिकेच्या संविधानानेही हा अधिकार मान्य केला.

**2. परमादेश (Mandamus) :- आम्ही आज्ञा देतो.**

- लॅटिन अर्थ = आम्ही आज्ञा देतो. We command.
- **स्वरुप :-** "एखाद्या शासकीय पदावरील व्यक्ती वा संस्था तिचे कार्य करत नसल्याने नागरिकांच्या मुलभूत हक्कांची पायमल्ली होत असल्यास असा अर्ज करता येतो." न्यायालयाच्या कर्तव्यपालनाची आज्ञा.

**3. प्रतिषेध (Prohibition) :- प्रतिबंध करणे**

- एखादा खटला कनिष्ठ न्यायालयात चालु असताना काही अनियमित कारणांमुळे निर्णय घेणे इष्ट वाटत नसल्यास.
- कनिष्ठ न्यायालयाने तो खटला चालविण्याचा कायदेशीर अधिकार नसल्यास.
- खटला कनिष्ठ न्यायालयात अधिकार क्षेत्राबाहेरील असल्यास.

**4. उत्प्रेक्षण (Certiorari) :- असे प्रमाणिक करण्यात येते की**

- कनिष्ठ न्यायालयाकडे चालणारा खटला वरिष्ठ न्यायालयाने चालवावा अशी विनंती करणारा अर्ज.
- कनिष्ठ न्यायालय एखादा खटला चालविण्यास असमर्थ आहे असे वरिष्ठ न्यायालयाला आढळुन आल्यास. न्यायदान योग्य व्हावे.
- प्रतिषेध - प्रतिबंधक स्वरुपाचा, उत्प्रेक्षण - खालच्या कोर्टातील खटला वरिष्ठ न्यायालयात दाखल करणे.

**5. अधिकारपृच्छा (Quo - warranto) :- कोणत्या अधिकाराने**

- कोणतेही सरकारी वा सार्वजनिक पद पात्रता नसतानाही कोणी भुषवित असेल.
- पदग्रहण करण्याविषयी पृच्छा करण्याचा अधिकार.
- **कलम 33 -** सशस्त्र दले आणि मुलभूत हक्क.
- **कलम 34 -** मार्शल लॉ आणि मुलभूत हक्क.

# भारतीय राज्यव्यवस्था नोट्स

- **कलम 35 -** मूलभूत हक्काच्या अंमलबजावणीकरिता कायदे करण्याचा संसदेचा अधिकार.

**मूलभूत हक्काविषयीचे खटले :-**

- **1950 - ए.के. गोपालन् विरुद्ध मद्रास राज्य -**
मुलभूत हक्क महत्त्वाचे असून कलम 21 चा अर्थ संकूचित न लावता तो व्यापक लावण्यात यावा.
- **1978 - मेनका गांधी विरुद्ध केंद्र सरकार -**
कलम 21 बाबत व्यक्तींच्या जीवताच्या हक्कांची संकल्पना व्यापक बनविले आणि या संदर्भात न्यायीक पुर्नविलोकनाचा हक्क प्रस्थापित केला.
- **1993 - इंदिरा सहानी विरुद्ध केंद्र सरकार -**
कलम 14 चे आकलन मार्गदर्शक तत्वाच्या प्रकाशात करून घेतले पाहिजेत.
- **1993 - उन्नी कृष्णन् विरुद्ध आंध्रप्रदेश सरकार -**
कलम 21 ची व्याप्ती वाढवून त्यात 14 वर्ष मुलांचा शिक्षणाचा मुलभूत हक्क म्हणून समाविष्ट करावा.
- **1996 - बालाजी राघवन विरुद्ध केंद्र सरकार -**
राष्ट्रीय पुरस्कार जसे, भारतरत्न, पद्मविभूषण, पद्मभूषण, पद्मश्री हे कलम 18(1) अंतर्गत किताबे या व्याख्येत येत नाहीत. हे पुरस्कार समतेच्या तत्वाचा भंग करत नाही. मात्र पुरस्कार प्राप्त व्यक्तींने त्याचा व्यापार नावाआधी किंवा नावानंतर करू नये.